# बीज ४९ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी**

**भंडारा, दि.०३ :** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला अर्थात महाबीजची स्थापना २८ एप्रिल १९७६ रोजी झालेली असुन महाबीजने आज ५० व्या वर्षांत पदार्पण केले, महाबीजला शेतक-यांची बियाणे कंपनी म्हणुन संपुर्ण महाराष्ट्रात ओळखल्या जाते.

महाबीजचा भंडारा जिल्हयाचा ४९ वा वर्धापन दिन बिज प्रकिया केंद्र, गडेगाव येथे जिल्हा व्यवस्थापक सुभाष मेश्राम याच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सदर कार्यक्रमास महाबीजचे बिजोत्पादक, भागधारक शेतकरी, विक्रेते, सर्व कर्मचारी व जिल्हा व्यवस्थापक सपन्निक उपस्थित होते. कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे व महाबीजचे भागधारक श्री केशवराव बांते, कन्हळगाव तहसिल मोहाडी व भास्कर मेश्राम, कन्हळगाव तहसिल मोहाडी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करतांना कार्यकमाचे अध्यक्ष सुभाष मेश्राम यांनी महाबीजचा आतापर्यंतचा प्रवास व भविष्यातील महाबीजचे धोरणा याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. जैविक शेती आज काळाची गरज असुन जैविक शेतीसाठी महाब-ीजकडे उपलब्ध असलेले हिरवळीचे पिक देचा, जिवाणु खते व ट्रायाकोडर्माचे महत्व उपस्थित शेतकरी वर्गास सांगितले व यास सर्व उपस्थित वगनि बांगला प्रा-तिसाद दिला.

मानवी जिवनात वृक्षाचे महत्व असाधारण असल्यामुळे व पर्यावरण पुरक असल्यामुळे उपस्थित अतिथी व कर्मचारी वर्गाच्या उपस्थितीत जिल्हा व्यवस्थापक श्री सुभाष मो. मेश्राम यांनी वृक्ष रोपणाचा शुभांरभ केला व एकुण सतरा वेगवेगळ्या वृक्षाची गडेगाव विज प्रकिया केंद्र येथे लागवड करण्यात आली.

उपस्थित बिजोत्पादक, भागधारक शेतकरी, विक्रेते व कर्मचारी यांचा शॉल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालक कृषि क्षेत्र अधिकारी सुधिर पिलेवान व आभार प्रदर्शन कृषि क्षेत्र अधिकारी कु. पलूवी बन्सोड यांनी केले.

# बैलगाडीच्या साहयाने रेतीची तस्करी सुरू

***साकोली तालुक्यातील प्रकार * तहसीलदार तलाठी मंडळ अधिकारी मंडळ व पोलीस विभाग यांची याकडे दुर्लक्ष * लाखो रुपयाची रेती बैल गाडीच्या साहयाने विक्री सुरू**



**महासागर प्रतिनिधी**

**गोंडउमरी ,दि.०३ :** साकोली तालुक्यातील चुलबंद नदीच्या पात्रातून दररोज लाखो रुपयाची रेति बैलगाड्यांच्या साहयाने तस्करी करून ट्रॅक्टर वाले टिप्पर वाले व विटा भट्टी करिता विक्री केला जात आहे यासारखे प्रकार अनेक गावांमध्ये सुरू आहे.साकोली तालुक्यामध्ये असलेले गावाचे समावेश सावरबन ,धर्मापुरी, कुंभली ,वडद ,सुकडी, महालगाव, पळसगाव ,गोंडउमरी , लवारी उमरी, परसोडी ,व शेंदूरवाफा इत्यादी गावामध्ये सकाळ पासून तर रात्रीच्या आठ वाजेपर्यंत व पहाटे तीन वाजेपासून तर रात्रीच्या दहा वाजेपर्यंत दुपारी शुद्धा बैलगाडीच्या साहयाने रेतीची तस्करी करून स्वतःच्या घरी न नेता टिप्पर वाले व ट्रॅक्टर वाल्यांना विक्री केली जात आहे .मात्र तलाठी तहसीलदार व मंडळ अधिकारी यांच्या डोळ्याच्या समोर चित्रफिती असून दिसत असतो मात्र कुठलाही महसूल विभागाचा अधिकारी बंडी चालकावर आज पर्यंत एकही गुन्हा दाखल झालेला नाही एवढा मोठा लाखो रुपयांच्या चोरीचा प्रकार असून शासनाचा महसूल सर्वाधिक जास्त बैलगाडीच्या साहयाने केला जात आहे घरकुल वाल्यांना लागणारी रेतीही ट्रॅक्टरच्या साहयाने खरेदी केली जातो हीच व्यक्तीट्रॅक्टर वाल्यांना जास्त दराने विक्री केले जातात व त्या ठिकाणी सर्वाधिक चोरीचे प्रकार असुनखरे तर बे ल गाडी चालकच करीत असतात गोंडु उमरी परिसरातील अनेक शेतकऱ्याकडे बैलगाड्या असून त्यांचा वापर सर्वाधिक जास्त रेतीसाठी केला जात आहे तसेच उमरीलवारी व परसोडी या भागामध्ये सर्वाधिक जास्त विटा यवसाया-पासून विटा वाल्यांना रेतीचा साठा पूर्वीला जातो व ही रेती जास्त दराने विकली जात आहे यामुळे शासनाला लाखो रुपयाचा महसूल बुडालेला आहेमात्र याकडे अधिकारी वर्ग दुर्लक्ष केले आहे रस्त्यावरून चालणाऱ्या बैलगाड्या पादचारी चालणाऱ्या व्यक्तींना तसेच मोटरसायकल वाल्यांना जान्यास येण्यास अडथळा निर्माण करीत असतात आणि त्यामुळे वाहतुकीची कोंढीनिर्माण होतो पायी चालणाऱ्या व्यक्तींना नाचा त्रास सहन करून तात्काळात उभे राहावे लागते मात्र बैलगाडी वाले टू व्हीलर फोर व्हीलर व सायकल वाल्यांना व पा य चालणाऱ्या व्यक्तींना साईट सुद्धा देत नाहीत यामुळे अनेक लोकांना त्रास सहन करावी लागत आहे जी बैलगाडी टायरच्या चक्क्याची आहे अशा बैलगाड्या तात्काळ बंद करण्यात यावा तसेच लाकडी चाकाच्या बंड्या रस्त्यावर चालविण्यात यावा असे काही जाणकार व्यक्तीचे मत आहे मात्र शेति च्या वापरा करिता लाकडी बैलगाडीचा वापर कारेता यावे व रेति चा बैला त्या चालकावर बंदीव्यक्तीसाठी कायमच्या बंद करण्यात यावा अशी मागणी परिसरातल्या जनतेने केली आहे महसूल मंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन देऊन तालुक्यातील सर्व रेति तस्कर करणाऱ्या बैलगाड्या रस्त्यावरील बंद करण्यात यावा अशी जनतेने मागणी केली आहेत्या बैलगाडी वाल्यांना रेतीची गरज आहे अशा चालकांना ग्रामपंचायतचा टॅक्स भरल्याशिवाय रेती भरता येणार नाही अशी अट लागण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# वन्यप्राण्यांच्या उपद्रवाचे शेतकऱ्यांनी करावे तरी काय?

## उन्हाळी धानाची होत आहे नासाडी

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी , दि. ०३मे :** शेतकऱ्यावरील संकटाची मालिका कधीच कमी होणार नाही असे चित्र संपूर्ण जिल्ह्यात दिसत आहे. खरीप हंगामात घेतलेल्या पिकांपासून ते रब्बी पीक घेईपर्यंत शेतकऱ्यांचे हालच हाल आहेत. शेतकऱ्यांना शेतकरी शेतात राब राब राबून कर्जबाजारी होऊन शेती करत असतात. निसर्गाला आपला देव माणून प्रत्येक हंगामाची सुरुवात शेतकरी करीत असतो. परंतु निसर्गाची साथही शेतकऱ्यांना मिळेल याची शाश्वती राहत नाही.

जिल्ह्यात सर्वत्र खुप मोठ्या प्रमाणात रब्बी पिके घेतले जातात. दिवस उन्हाळ्याचे असताना ज्या शेतकऱ्याकडे स्वतःची पाण्याची सोय नसल्यास ते शेतकरी रब्बी पिक घेत नाही. त्यामुळे काही शेत शिवार हे मोकळे असते. अशात ज्या शेतकऱ्यांच्या शेतात रब्बी पिकाचे उत्पादन घेतले जाते अशा शेतात वन्यप्राण्यांचा उपद्रव खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शेतकरी शक्य त्या पद्धतीने शेतीचे रक्षण करण्याचे प्रयत्न करतो. रात्री बे रात्री शेतकऱ्यांना शेतात जावे लागते. परंतु वन्यप्राण्यांच्या हौदसाने शेतकरी मात्र आता चांगलाच हवालदिल झाला आहे .

एकंदरीत खरीप हंगामातही शेतकऱ्यांची डामाडोल परिस्थिती असताना संकटावर मात करण्यासाठी उन्हाळी हंगामात शेतकऱ्यांनी धान या पिकासोबतच भाजीपालावर्गीय पिकाची लागवड केली आहे.

परंतु कधी रानडुकरांचे कळप तर कधी माकडाचे कळप पिकाची नासाडी करीत आहेत. वन्यप्राण्यांचा उपद्रव शेतकऱ्यांच्या जिवावर उठला असून अधिकारी कार्यालयातून आदेश देण्याचे काम करीत असल्याने शेतकऱ्यांचे उन्हाळी हंगामातील पिके धोक्यात आली आहेत.

सिंचनाची सोय होत असल्याने शेतकऱ्यांनी खरीप हंगामासोबत रब्बी हंगामातील पिकाची कापणी झाल्यानंतर उन्हाळी हंगामात धान, भाजीपाला पिकाची लागवड केली आहे.

शेतीच्या व्यवसायातून जंगलव्याप्त भागात शेतमजुरांनाही रोजगार मिळत आहे. परंतु, रात्रीच्या सुमारास वन्यप्राण्यांचाही उपद्रव वाढत चाललेला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी आपल्या पिकाचे रक्षण करण्यासाठी जिवावर उदार होऊन शेतकऱ्यांना जागल सुद्धा करावी लागत आहे. काही शेतकऱ्यांच्या शेती जंगलव्याप्त भागात अभयारण्यालगत असल्याने जंगलातील वन्यप्राणी विशेषतः तृणभक्षी प्राणी शेतात शिरून नुकसान करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे रक्षण करण्यासाठी दिवसा व रात्रीच्या सुमारासही जागल करावी लागत आहे.

अशात तृणभक्षी प्राण्यांवर उपजिवीका करणारे हिंस्रप्राणी वाघ, बिबट, अस्वल व इतर प्राणी त्यावर नजर ठेवून असतात. जर का शेतकरी शेतात गेला आणि काही कमी जास्त झाल्यास त्याला जिम्मेदार कोण असेल? अनेकदा शेतकऱ्यांवरही हल्ले झाले आहेत. त्यामुळे वन्यप्राण्यांचा उपद्रव शेतकऱ्यांच्या जिवावर उठला आहे.

### झटका मशीनची प्रतीक्षा

रब्बी पिकांची फसल शेतात असल्याने वन्यप्राण्यांचा हौदोस चांगलाच वाढला आहे. त्यामुळे शेतपिकाचे रक्षण व्हावे म्हणून शेतकरी वाटेल ते प्रयत्न करीत आहेत . शेतकऱ्यांनी शेतात बहुरूपीय पुतळे सुद्धा बनवले आहे. तरीसुद्धा वन्यप्राण्यांचा उपद्रव कमी झाला नसल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे.

अश्यात वनविभागाकडून झटका मशीन मिळाल्यास शेतीची सुरक्षा होईल आणि शेतपीके सहजरीत्या घेता येईल. त्यामुळे शेतकरी झटका मशीनच्या संदर्भात नेहमीच वनवीभागाशी संपर्क करीत आहे.

### आलेले पीक जाण्याची शक्यता

घरातील मुलाबाळाप्रमाणे शेतकरी शेतीची जोपसना करतो. कर्जाचे ओझे डोक्यावर घेऊन त्याला शेती करावी लागते. त्यात मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह त्याला करावे लागते.

' सध्या काही काही विभागात झटका मशीनचे वितरण सुरू आहेत. मागणी खूप जास्त आहे आणि मशीनचा साठा कमी प्रमाणात आहे. पण येत्या काही दिवसात सर्वच विभागात आम्ही झटका मशीन वाटण्याचा प्रयत्न करू '

**अपेक्षा शेंडे**
**वनक्षेत्र अधिकारी कांद्री**

# आंधळगाव परीसरात रोहयो ची कामे सुरू करा

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी :** तालुक्यातील आंधळगाव परीसरातील गावामध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्याची मागणी राकॉंचे ( श. प.) तालुका अध्यक्ष श्याम कांबळे यांनी केली आहे . शेतीची कामे संपल्याने व हाताला काम नसल्याने शेतकरी व शेतमजूर घरीच बसले आहेत. शासन म्हनतो मागेल त्याला काम आणि तेही शंभर दिवस देऊ मात्र एप्रिल महिना सुरू होऊनही कामाचा पत्ता नाही. एप्रिल महिना सुरू झाला असून नंतर मे महिना लागेल या महिन्यात शेतकऱ्याचा शेतीचा हंगाम सुरू होतो. पूर्वी मार्च महिन्या पासून रोहयो चे काम सुरू होत होते . आता तर एप्रिल महिना सुरू झाला , परंतु रोजगार हमी योजने चे काम अद्याप सुरू झाले नाही . मार्च महिन्यात रोजगार हमीचे काम सुरू व्हायला हवे होते पन काम सुरू झाले नाही आणि मजुराला काम मिळाला नाही . त्यामुळे मजुर बाहेर गावी कामाच्या शोधात पलायन करीत आहेत . हाताला काम नाही मग मजुरांनी करायचे कसे ? असा प्रश्न मजुराना पडला आहे . शासन रोजगार हमीच्या मजुराना १०० दिवस म्हणजे तिन महिने काम देऊ असे म्हणतो पन त्याची अमलबजावनी होत नाही . याकडे कोणीही लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही . काही गावात कुशल कामाकडे कडे जास्त लक्ष दिले जाते.

कारण त्या कामामध्ये रोजगारसेवक , टीपीओ यांना मलाई खायला मिळते. अकुशल कामामध्ये कमाई होत नसल्याने या कामाकडे लक्ष दिले जात नाही. अकुशल कमात कमाई होत नाही पण यामध्ये नाला खोलीकरण , पांदन रस्ता माती काम , भातखचरे ही कामे असल्याने मंजुरांना काम मिळतो . मंजुराच्या हाताला काम मिळाला तर त्याला पैशाची मदत होईल दोन पैसे मजुरांच्या हातात येतील व त्यांचा उदरनिर्वाह चालेल . महागाईच्या काळात मजुर वर्ग व शेतकरी मोठया चिंतेत आहे . संबधित विभागाच्या अधिकाऱ्यानी या विषयाकडे लक्ष देऊन आधळगाव परिसरातील गावामध्ये रोजगार हमीचे कामे त्वरित सुरू करन्यात यावी , अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष ( श. प. ) श्याम कांबळे यांनी केली आहे.

# प्राचीन श्री गणपती मंदिराचे खा. डॉ. प्रशांत पडोळेंच्या हस्ते झाले भुमिपुजन

## साकोलीत साकारणार संगमरवरी नक्षीकामात आकर्षक मंदिर




**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. ०३मे :** मुख्य शहर गणेश वार्ड साकोलीतील १३२ वर्ष पेक्षाही जूने श्री गणपती मंदिराचे जीणीद्धार भुमिपुजन शुभारंभ ( बुध. ३० एप्रिल )ला अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर थाटात संपन्न झाले. येथे संगमरवरी नव्या मंदिराचे लवकरच निर्माण कार्य सुरू केले जात असून हे जागृत मंदिर अष्टविनायकांपैकी एक मानले जाते हे विशेष.

श्री गणेश मंदिर येथे नविन मंदिराच्या जिणीद्धाराला खासदार डॉ. प्रशांत पडोळे, रवि अग्रवाल, डॉ. राजेश चंदवानी, इंजि. प्रसन्न गुप्ता, उद्योगपती अरूण बी. गुप्ता, मनोहर कापगते, श्रीराम कापगते, अशोक गुप्ता आदी उपस्थित होते. पं. मनोजकुमार दूबे ( शास्त्री ) यांनी भूतपूर्व स्व. पं. रमेशराव कुलकर्णी यांचे पुत्र नचिकेत कुलकर्णी यांद्वारे पुजा अर्चना केली.

मंदीरात महाआरती करून खा. डॉ. प्रशांत पडोळे यांनी मंदिराच्या जिणीद्धाराचे भुमिपुजन शुभारंभ केले. लवकरच राजस्थान वरून शिल्पकार येत असून या प्राचीन श्री गणपती मंदिराचे नविन संगमरवरी नक्षीकामात बांधकाम सुरू केले जात आहे. सदर मंदिर हे फार प्राचीन असून ब्रिटिशकालीन राजवटात गणेश वार्डातील स्वातंत्र्य संग्राम सैनिक स्व. उमरावसिंह जव्हेरी हे ब्रिटिश पोलीसांपासून याच मंदिरात लपून बसत गनिमी कावा रूपाने हल्ला करीत असत हे इतिहासातील सुवर्ण क्षण होते. श्री गणेश मंदिराच्या जिर्णोद्धाराला आशिष गुप्ता, संदीप गुप्ता, अखिलेश गुप्ता,आशिष चेडगे, सपन कापगते, रवि भोंगाणे, सुरज डुंभरे, प्रशांत अंदूलकर, कुणाल देशमुख, विजय दूबे, अमेय डुंभरे, विजय जैन, आणि श्री बाल गणेश उत्सव मंडळातील सर्व सदस्यगण उपस्थित होते.

# हनुमंताचे जीवन म्हणजे सेवा, नम्रता आणि शिस्तीचा आदर्श

**ह.भ.प.धनराज गाढवे महाराज यांचे प्रतिपादन;निलज बु. येथे हनुमान जयंती उत्साहात**

**वरठी , :** आजच्या धावपळीच्या युगात नम्रता, सेवावृत्ती आणि शिस्त ही माणसाच्या जीवनातील मूल्ये लोप पावत चालली आहेत. मात्र, हनुमंताच्या जीवनचरित्रातून याच गुणांचे महत्त्व अधोरेखित होते. केवळ बळावर नव्हे, तर विनय, सेवा आणि शिस्तबद्ध जीवनशैलीमुळे व्यक्ती महान बनते. हनुमंताचा सेवाभाव, नम्रता व शिस्तीचे जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. धनराज गाढवे महाराज यांनी केले. निलज बु. येथील वैनगंगा नदीच्या तीरावरील सार्वजनिक हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गाढवे महाराज पुढे म्हणाले, 'हनुमंत हे केवळ पराक्रमी नव्हते, तर ते महान सेवक, विनयशील, शिस्तप्रिय व गुरूभक्त होते. त्यांनी श्रीरामांच्या प्रत्येक आज्ञेचे तंतोतंत पालन केले आणि कर्तव्याच्या मार्गावर अढळपणे उभे राहिले. ही शिकवण आजच्या तरुणांनी आचरणात आणली पाहिजे.' शनिवारी सार्वजनिक देवस्थान कमेटीच्या वतीने हनुमान जयंतीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यामध्ये घटस्थापना, हनुमान महापूजा, भजन कार्यक्रम तसेच सकाळी हनुमान चालीसा, रामरक्षा, भीमरूपी व इतर स्तोत्रांचे पठण करण्यात आले. यानंतर ह.भ.प. धनराज गाढवे महाराज यांचे गोपालकाल्याचे कीर्तन झाले. यावेळी गावातील महिला, पुरुष भाविक आणि बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते. दहीहंडी पूजन, आरती आणि प्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमास शंकर कांबळे, गुजोबा गाढवे, तेजराम कनपटे,सरपंच लिलाधर कांबळे, उपसरपंच विनोद गाढवे, सदस्य दिनेश तितीरमारे, घनश्याम कांबळे, भाऊराव बुधे, योगेश्वर गाढवे, दामोधर ईश्वरकर, अरविंद देवगडे, चुन्नीलाल माटे, नंदलाल कांबळे, विनेश बांते, मयाराम कांबळे, डुलिचंद बोरकर, शालिक ईश्वरकर, घनश्याम गिरी, सिताराम डोळस, सरगम उरकुडे, बादल माटे, शुभम ईश्वरकर, भूषण गाढवे, महिला मंडळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिराची आख्यायिका निलज बु. येथील हनुमंताची मूर्ती प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ग्रामदैवत म्हणून हनुमंताला पूजेचा पहिला मान दिला जातो. पूर्वी हे गाव वैनगंगा नदीच्या काठावर वसलेले होते आणि मंदिरही नदीकिनारीच होते. मात्र, दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे गावकऱ्यांचे मोठे नुकसान होत असे. त्यामुळे गावाच्या प्रमुख व्यक्तींनी गावाचे स्थलांतर केले. मात्र, मंदिर जुन्याच ठिकाणी राहिले. गावातील धर्मा बडगे नावाचे वारकरी हनुमंतभक्त होते. एके दिवशी स्वप्नात हनुमंताने दृष्टांत दिल्यानुसार त्यांनी मूर्ती नदीकिनारील मंदिरातून उचलून गावात तयार केलेल्या चबुतऱ्यावर आणली. यापूर्वी अनेकांनी मूर्ती हलवण्याचे प्रयत्न केले होते, पण यश आले नव्हते. त्यामुळे ही मूर्ती धर्मा बडगेंनी कशी आणली, याबद्दल गावात आश्चर्य व्यक्त झाले आणि काही लोकांनी त्यास विरोध केला. ही आपली चूक असल्याचे जाणवून त्यांनी मूर्ती परत नदीकिनारी नेऊन ठेवली. त्यानंतर कोणालाही ती मूर्ती हलवता आली नाही. म्हणून आजही ती मूर्ती नदीकाठावरील मंदिरातच आहे आणि गावकरी तेथे जाऊन नियमित पूजाअर्चा करतात.

# भारतीय जनता पक्षाचे विचार आणि केंद्र शासन व राज्य शासनाची योजना ची माहिती घरोघरी पोहोचावे - गजानन निनावे



**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा , दि. ०३मे :** महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी यांचे सूचनेनुसार व भंडारा जिल्हा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष प्रकाश बाळबुद्धे यांचे आदेशानुसार दिनांक २७ रोज रविवारला जय हिंद सार्वजनिक वाचनालय सिहोरा नगरातील चारही बूत चे गाव वस्ती जनसंपर्क अभियान कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमात गावातील अंगणवाडी, मंदिर, सामाजिक सभागृह या ठिकाणी बैठका घेण्यात घेऊन केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या योजनेची माहिती जनतेला देण्यात आली. केंद्र शासन राबवीत असलेल्या तसेच राज्य शासनाद्वारा राबवीत असलेल्या योजनेच्या लाभ जनतेने घ्यावा व ही माहिती घरोघरी पोहोचावे, अशी विनंती भारतीय जनता पार्टीचे भंडारा जिल्हा सचिव गजानन यांनी केली आहे. या कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव तसेच सिहोरा पंचायत समिती संपर्कप्रमुख गजानन निनावे, सह संपर्कप्रमुख दिनेश कामथे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती धनेंद्र तुरकर, सरपंच सौ. रंजना तुरकर, माजी सरपंच कालिदास कुंभारे, उपसरपंच सलाम शेख, भारत चौधरी, दिनेश तुरकर, रवी वासनिक, दामू नंदनवार, धनेंद्र नेवारे, अरविंद पटले, पप्पू पारधी, सतीश पटले, तेजराम ठाकरे, बालू बिसने, छत्रपती तुरकर, अनिल रीनायते, विनोद गौतम, डॉ. रॉय, तेजस्वर टेंभरे, गरीबदास निनावे, प्रकाश कुंभारे, नरेश बोकडे, दसाराम निकुळे तसेच पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते मंच संचालन अरविंद पटले यांनी केले, आभार प्रदर्शन उपसरपंच सलाम भाई शेख यांनी केले. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हमला मध्ये जे निरपराधी बळी पडले त्यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जाणार पडद्याआड !

## जलकुंभावर जल जीवन मिशनचा ताबा : केला फक्त तगरंगोटीवर खर्च

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** नागरिकांना जलशुद्धीकरण आणि प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून शुद्ध पाणी उपलब्ध करण्यासाठी सुकळी नकुल प्रादेशिक पाणी पुरवठा बपेरा गावाचे हद्दीत तयार करण्यात आली. योजनेची जलवाहिनी जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रत्येक गावात देण्यात आली.

या योजनेचे अभिनव जलकुंभ निर्माण करण्यात आली. गुंडभर पाणी योजनेने नागरिकांना दिले नसताना योजनाच गुंडाळण्यात आली आहे. या योजनेच्या जलकुंभावर जल जीवन मिशनने ताबा घेतला आहे. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पडद्याआड गेल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.

बपेरा जिल्हा परिषद क्षेत्रातील गावांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी सुकळी नकुल प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.

योजनेला जागा मिळाली नसल्याने बपेरा गावाचे हद्दीत ही योजना साकारण्यात आली आहे. योजनेला जलशुद्धीकरण केंद्र असल्याने जिल्हा परिषद क्षेत्रातील देवरी देव, सुकळी नकुल, बपेरा, देवसर्रा, बिनाखी, गोंडीटोला, ब्राह्मणटोला, महालगाव, वारपीडकेपार, सोंड्या, गावात जलवाहिनी घालण्यात आली. या योजनेचे गावात अभिनव जलकुंभ तयार करण्यात आले.


जलवाहिनी आणि जलकुंभ बांधकामावर कोट्यवधी खर्च करण्यात आले. बावनथडी नदीवर पंपगृह देण्यात आले. योजनेपासून गावांचे अंतर १२ किमीवर असल्याने विलंब पाणीपुरवठा करण्याची अपेक्षा गावकऱ्यांना होती. परंतु झाले उलटेच कोट्यवधी खर्चुनही योजनेचे पाणी गावात पोहचले नाही.

पुन्हा गावकऱ्यांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशन हर घर नल योजना गावात मंजूर करण्यात आली. परंतु या योजनेने नागरिकांचा विश्वास संपादन केला नसल्याने सर्वेक्षण करताना गावात विरोध होऊ लागला आहे. गावातील नळ योजनाच बरी, असे ठणकावून सांगितले आहे. परिसरात बहुतांश गावात जल जीवन मिशन हर घर नल योजना देण्यात आली आहे. गेल्या वर्षभरापासून एक थेंब पाणी नागरिकांचे दारात पोहचले नाही. जल जीवन मिशन हर घर नल योजनेच्या प्रस्तावित कामाची विभागीय चौकशी करण्याची ओरड सुरू झाली आहे.

***तरीही गावकरी तहानलेलेच !***

:-

नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जल जीवन मिशन हर घर नल योजना अशा योजना राबविण्यात आलेल्या आहेत. परंतु योजना



नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा करू शकल्या नाहीत, विशेषतः जल जीवन मिशन हर घर नल योजना वादग्रस्त ठरली आहे.

# लाखांदूर आधार केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ !

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर :** महाराष्ट्रातील महिला व बालकल्याण विभागातर्फे सुरू असलेल्या आधार नोंदणीच्या कामावर अलीकडच्या काळात संकट ओढवले आहे. यापूर्वी महानायटी या सरकारी कंपनीमार्फत राज्यभर हे काम सुरळीतपणे सुरू होते. मात्र, अचानकपणे हे काम दुसऱ्या खाजगी कंपनीकडे सोपवण्याचा निणऱ्य सरकारने घेतला असून त्यामुळे अनेक आधार केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे हजारो युवक बेरोजगार झाले आहेत. आपल्या रोजीरोटीवर गदा आलेल्या या तरुणांनी आता आक्रोश सुरू केला आहे. अनेकांनी लाखो रुपयांचे गुंतवणूक करून आधार नोंदणीची उपकरणे घेतली, कार्यालये सुरू केली आणि कामकाज उभे केले होते. मात्र आता अचानक काम थांबवल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. सध्या महिला व बालकल्याण विभागामार्फत पोषण ट्रॅकर प्रणालीत लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचे मोठे काम सुरू आहे. काम यापूर्वी महाआयटीकडून करण्यात येत होते. या प्रक्रियेमध्ये जिल्हानिहाय हजारो युवक कार्यरत होते. यामुळे ग्रामीण आधार चालक संघटनांनी या निणऱ्याविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली असून, सरकारने या बदलामागचे कारण स्पष्ट करावे, तसेच, नव्याने दिलेल्या कंपनीकडे काम सोपवताना पारदर्शकतेचे कोणते निकष वापरले गेले याची माहिती जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भागातही डिजिटल सुविधा पोहोचत होती. मात्र, आता एका नव्या खाजगी कंपनीला हे काम देण्यात आले असून जुन्या आधार चालकांची सर्व यंत्रणा बाजूला सारण्यात आली आहे. सरकारने कोणतीही पूर्वसूचना न देता काम थांबवल्यामुळे तरुणांमध्ये प्रचंड नाराजी आहे. 'केवळ काही अधिकायांच्या स्वार्थासाठी आणि टक्केवारीच्या राजकारणासाठी हजारो तरुणांना बेरोजगार करणे हा अन्याय आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया लाखांदूर तालुक्यामधील काही चालकांनी दिली. त्यांच्या मते, हे काम महाआयटीकडेच राहिले असते तर सर्व चालकांचे हित जोपासले गेले नसते.

***आमची महीला व बालविकास प्रकल्प यांनी कसलाही विचार विनिमय न करता एका रात्री संपूर्ण राज्यातील आधार संच बंद केले असून या आधार सेंटर साठी लाखो रूपयाची गुंतवणूक करून आधार सेंटर उभारले मात्र शासनाने एका रात्रीतच उध्वस्त केल्याने आम्हा आधार सेंटर चालकांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे त्यामुळे तात्काळ सदर सेंटर सुरू झाले पाहीले.***

***आधार सेंटर चालक***